नांदगांव-खंडेश्वर येथील तहसिल कार्यालयाच्या इमारत बांधकामाच्या रु.७७१.५५ लक्षच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक:- बीएलडी-२०१६/प्र.क्र. १९५/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :२२ फेब्रुवारी, २०१८.

संदर्भ:- १) विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. आकाअ/साप्रवि/जी.बी.-४/कावि-२४६/२०१६, दि.०३/०९/२०१६.

प्रस्तावना:-

संदर्भाधीन पत्रान्वये नांदगांव-खंडेश्वर येथील तहसिल कार्यालयाच्या इमारत बांधकामाच्या रु. ७७७.९८ लक्ष खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

२. सदर इमारत बांधकामाचे उपविभागीय अभियंता, सा. बां. उपविभाग, बडनेरा यांनी सन २०१५-१६ च्या जिल्हा दर सुचीवर आधारित रु.७७७.९८ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर अंदाजपत्रक विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी दि.०३/०९/२०१६ च्या पत्रासोबत शासनास सादर केले आहे.

शासन निर्णय:-

नांदगांव-खंडेश्वर येथील तहसिल कार्यालयाच्या इमारत बांधकामाच्या **रु.७७१.५५ लक्ष (रुपये सात कोटी एकाहत्तर लक्ष पंचावण्ण फक्त)** च्या अंदाजपत्रकीय खर्चास पुढील अटींच्या अधीन राहून शासन प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे:-

अटी व शर्ती-

१) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही करत असताना उपभोक्त्या विभागामार्फत सा. बां. विभाग शासन निर्णय, क्र. बीडीजी २०१४/प्र. क्र. ९६/इमा.३, दि. ०८/०७/२०१४ मधील कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्यात आली आहे, असे सा. बां. विभागामार्फत गृहीत धरण्यात येत आहे.

२) या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यापूर्वी सचिव समितीची मान्यता घेण्यात यावी. सचिव समितीच्या मान्यतेकरीता आवश्यक प्रपत्रात माहिती भरुन सोबत ठेवण्यात आली आहे.

३) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

४) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रके मंजूर करुनच काम हाती घ्यावे.

५) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय, क्र. इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां. क.१, दि. १०/०१/२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शन तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

६) प्रस्तुत नस्ती सोबतच्या अंदाजपत्रकावर उपभोक्ता विभागाची स्वाक्षरी व मुख्य अभियंता, सा. बां.प्रा.वि. अमरावती यांची स्वाक्षरी होणे आवश्यक आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने मंजूर केलेल्या सदर प्रस्तावाच्या अंदाजपत्रकातील कामाच्या वावामध्ये समाविष्ट असलेल्या बाबी व किंमत सोबतच्या “विवरणपत्र अ” मध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत.

वर नमूद करण्यात आलेल्या कामाच्या वावात व किंमतीमध्ये बदल झाल्यास सदर बदलास वेळीच सक्षम प्राधिका-याची मंजुरी घेण्यात यावी.

२. सदर मान्यता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सचिव समितीने चक्रीय पद्धतीने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन व शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- विअप्र -२०१३/प्र. क्र.- ३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७/०४/२०१५ मधील भाग- पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १ नियम क्र.१३४ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

३. सदर इमारत बांधकामासाठी येणारा खर्च लेखाशिर्ष “मागणी क्रमांक एच-८ ४०५९ - सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती ०५१, बांधकाम (०७) जिल्हा प्रशासन (योजनांतर्गत) ५३, मोठी बांधकामे (०७)(०१) मोठी बांधकामे (४०५९ ०७९९) (०७)(०२) आस्थापना खर्च (४०५९ ०८०५) (०७)(०३) हत्यारे व संयंत्र यांचा खर्च (४०५९ ०८१४)” या उद्दिष्टाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

४. सदर कामाची सुरुवात सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून सुरु होत आहे. उक्त लेखाशिर्षाखाली प्रस्तावित बांधकामाचे वर्षनिहाय खर्चाचे नियोजन पुढीलप्रमाणे राहील.-

आर्थिक वर्ष	या आदेशांतील बांधकामाचा अपेक्षित खर्च (रु. हजारात)	उक्त लेखाशिर्षाखाली सुरु असलेल्या इतर कामांसाठी आवश्यक तरतूद (रु. हजारात)	एकूण मंजूर तरतूद (रु. हजारात)
१.	**२.**	**३.**	**४.**
२०१७ - १८	------	४०८४८७	१०४४९९८
२०१८ - १९	७७१५.५	८३३०९७	११२८५९८
२०१९ - २०	२३१४६.५	६४१२५३	१२१८८८६
२०२० - २१	२३१४६.५	३५५९३२	१३१६३९७
२०२१ - २२	२३१४६.५	-----	१४२१७०८

५. उक्त लेखाशिर्षाखाली सुरु असलेल्या कामाच्या वित्तीय नियोजनाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.-

(रु. हजारात)

अ.क्र.	**कामाचे नाव**	**एकूण अपेक्षित खर्च (रु.)**	**मागील वर्षाअखेर झालेला खर्च (रु.)**	**चालू वर्षात अपेक्षित खर्च (रु.)**	**पुढील वर्षासाठी Carry Forward करावयाची तरतूद (रु.)**		
१.	**२.**	**३.**	**४.**	**५.**	**६.**		
					अ	**ब**	**क**
	महाराष्ट्रातील १९६ कार्यालयीन इमारतींची बांधकामे	६२९२००१	४१९७०३८	४०८४८७	८३३०९७	६४१२५३	३५५९३२

६. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४६१/इमा-३, दि. २१/११/२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०२२२१३४२०१०५१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Nilkanth Pandurang Awhad

Digitally signed by Nilkanth Pandurang Awhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e42a88b7548c3a7d48b7a77d85de3524cf8f2e7e0f87091223ad803d4d4a2a31, cn=Nilkanth Pandurang Awhad
Date: 2018.02.22 13:44:43 +05'30'

(नि. पां. आव्हाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
२. जिल्हाधिकारी, अमरावती.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अमरावती.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा- अमरावती.
६. तहसिलदार, नांदगांव- खंडेश्वर, जि. अमरावती.
७. उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-३), मंत्रालय, मुंबई-३२.
८. उप सचिव, नियोजन विभाग, (कार्यासन १४१६), मंत्रालय, मुंबई-३२.
९. उप सचिव, वित्त विभाग, (व्यय-९), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मुंबई-३२.

(शासन निर्णय क्रमांक :- बीएलडी-२०१६/प्र.क्र.१९५/ई-८, दि.२२/०२/२०१८ च्या सोबत)

"विवरणपत्र अ"

Name of Work : Construction of Central Administrative building at Nandgaon (Khandeshwar), Dist. Amravati (Tahsil Building)

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Particulars of items	Norms (Unit Rate Rs./Sqmt./meter/lumpsum etc.)	Cost in Rs.
(A)	**Essential items**		
1	**Building Proper (scope)**		
	a) Area (sqmt.) 1370.71 m2	17310.73 per sqmt.	23727991
	b) No. of floors		
	a) Area (sqmt.) 910.84 m2	15800 per sqmt.	14391272
	b) No. of floors		
	a) Area (sqmt.) 917.62 sqmt per floor	per sqmt.	
	b) No. of floors SF		
	a) Area (sqmt.)	per sqmt.	
	b) No. of floors TF		
	c) Foundation in B.C./ Weak soil		
	d) Cost of construction		38119263
2	**Electrification**	Internal 5% of 1(d)	1905963
		External 6% of 1(d)	2287156
	External Charges, MSEB charges, DG set etc.		1500000
		Total	5693119
3	**Water supply and Sanitation**	8% of 1(d)	3049541
4	**Miscellaneous items**		
	Compound wall 560.00Rmt	6900 per Rmt	3864000
	Internal Roads 1650.00m2	2100 per sqmt	3465000
		per sqmt	
	Approach Roads	57333 per Rmt	573330
	C.C. Drains 10Rmt	5000 per sqmt	6844850
	Furniture 1368.97 m2	lump sum	100000
	Rain water harvesting	lump sum	200000
	Fire fighting arrangements etc.	lump sum	100000
		lump sum	500000
	Soil investigations	1200 per Rmt	312000
	land development	lump sum	400000
	Plinth protection 260.00 Rmt	lump sum	300000
	Parking	5% of 1(d)	1905963
	Dismanteling		
	increase in DSR		
		Total	**18565143**
		Sub Total (A) =(1)+(2)+(3)+(4)	**65427066**

(B)	**Optional items**		
Sr.	**Items**		
1	Solar Energy System	lump sum	100000
2	Air Condition	lump sum	500000
3	Water Main Storage etc.	lump sum	1000000
4	Public Facility Center	lump sum	500000
		Sub Total (B)	**2100000**
		Project (A)+(B)=Total	**675270666**
		Add 4% for Contingencies on (d)	**1524771**
		Add 12% for GST on Total	**8103248**
		Total Cost of Project	**77155085**
		Say Rs. Lacs	**771.55 Lacs**